₹ ५००० श्री. नितिन देशपांडे
₹ ५००० श्री. राजेंद्र गदाले
₹ ३०० श्रीमती संजीवनी लिमये
₹ ५००० श्री. आशिष नाईक
₹ २००७ सौ. नमिता चौहान
₹ ६००० श्रीनिवासन परिवार
₹ ५०० श्री. लष्करे
₹ ५०० श्री. व्ही. जी. बेलसरे

या व्यतिरिक्त पादुकांवर भक्तांनी अर्पण केलेले ₹ २८४५ यात्रेसमवेत आलेल्या श्री. राधा मोहन सिंग यांनी पुणे शाखेचे खजिनदार श्री. नितिन देशपांडे यांचेकडे सुपुर्द केले.

**१४ जानेवारी २०१६ रोजी झालेला खर्च**

₹ ३००० व्हिडिओ शुटिंग आणि फोटो
₹ ३००० रामकृष्ण मठ, पुणे यांना शाखेच्या वतीने दिलेली देणगी
₹ २२० फोटो छपाई
₹ १८०० वेदशास्त्रोत्तेजक सभागृह सेवाशुल्क.
₹ ४००० प्रसाद
₹ २६२५ फ्लेक्स छपाई
₹ २०१० 'दिव्य जीवन' जानेवारी विशेषांक
₹ ५०० पोस्टेज

याव्यतिरिक्त खालील खर्च सदस्यांनी व्यक्तिगत पातळीवर केला -

₹ ४२१० डॉ. आनंद राव *(अष्टविनायक भेटवस्तू)*
₹ १५२५ श्री. भ. रा. नाईक *(शाली)*
₹ २००० श्री. राजेंद्र गदाले
*(ट्रेझर पार्क कम्युनिटी हॉलचे भाडे)*



## दिव्य जीवन संघ, पुणे शाखा वृत्तांत

- जानेवारी महिन्याचा सत्संग डॉ. राव यांच्या घरी दि. ३ जानेवारी रोजी झाला.
- 'दिव्य जीवन' या मासिक पत्रिकेचा वर्षारंभ विशेषांक परिवारातील सदस्यांना वितरित करण्यात आला.
- १४ जानेवारी २०१६ रोजी प. पू. स्वामी चिदानंद सरस्वती जन्मशताब्दीपूर्व आयोजित करण्यात आलेल्या आध्यात्मिक प्रचार यात्रेचा कार्यक्रम पुण्यात संपन्न झाला.

**❀ पुणे शाखेचा पत्ता ❀**

**श्री. गो. आ. नगरकर**
'स्वानंद' एस्. २०
सहजीवन सोसायटी
पर्वती, पुणे ४११००९
☎ ९३७०५७०२०६

**श्री. नितीन देशपांडे**
'ईशावास्य'
प्लॉट नं. ४९ /सायंतारा,
डी. एस. के. विश्व
धायरी, पुणे ४११०४१
☎ ०९८५०९३१४१७
०९८५०८२६९९०

पुस्त डाक

प्रति



# दिव्य जीवन



स्वामी शिवानंद सरस्वती



स्वामी चिदानंद सरस्वती

(दिव्य जीवन संघ, पुणे शाखा)
(ज्ञानयज्ञ म्हणून वितरित)
वर्ष ११ । अंक २
फेब्रुवारी २०१६

## स्वामी चिदानंद सरस्वती जन्मशताब्दीपूर्व आध्यात्मिक यात्रेचे पुण्यातील कार्यक्रम

पूर्व नियोजित वेळापत्रकानुसार दि. १४ जानेवारी २०१६ रोजी दुपारी अडीच वाजता आध्यात्मिक यात्रेचे पुणे येथे आगमन झाले. पुणे शाखेच्या सदस्यांनी कात्रज येथे जाऊन यात्रेचे स्वागत केले. ट्रेझर पार्क येथे थोडा वेळ पुणे शाखेच्या सदस्यांशी वार्तालाप करून सर्वजण कार्यक्रमस्थळी रवाना झाले. ट्रेझर पार्क येथील सर्व सोय श्री. गदाले आणि त्यांच्या कुटुंबियांनी केलेली होती.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला प. पू. स्वामी शिवानंद सरस्वतींच्या पादुकांचे पूजन करण्यात आले.

स्वागत शाखेच्या सदस्या सौ. राजलक्ष्मी देशपांडे यांनी केले. पुणे शाखेचे अध्यक्ष श्री. भ. रा. नाईक यांनी यात्रे समवेत आलेले स्वामी शिवचिदानंदजी, स्वामी धर्म निष्ठानंदजी, श्री. दवे आणि श्री. राधा मोहन सिंग यांचे शाल देऊन स्वागत केले आणि पुणे शाखेच्या कार्याविषयी माहिती दिली.

उभयता स्वामीजींनी आणि श्री. दवे यांनी यावेळी

आपले विचार मांडले. श्री. राधामोहन सिंग यांनी एक सुंदर भजन गायले. श्री. आनंद राव यांनी पुणे टप्प्याची आठवण म्हणून स्वामीजी आणि यात्रेसमवेत आलेल्या इतर सदस्यांना अष्टविनायकाची सुंदर फ्रेम भेट दिली. पुणे शाखेचे उपाध्यक्ष श्री. गोपाळरावजी नगरकर यांनी आभार प्रदर्शन केले. सौ. निलिमा देसाई आणि सौ. अनघा जेरे यांनी विश्वात्मक प्रार्थना सादर केल्यावर हा कार्यक्रम संपन्न झाला. उपस्थितांनी पादुका दर्शन आणि प्रसाद घेतला. यावेळी सर्वांना शाखेच्या वतीने जानेवारी महिन्याचा 'दिव्य जीवन'चा अंक, चिदानंद चालिसा आणि हैद्राबाद तसेच बस्तरहून या यात्रेनिमित्त प्रकाशित झालेले साहित्य वाटण्यात आले. श्री. नविन निवर्थी यांनी दिव्य जीवन संघाच्या वतीने प्रकाशित झालेली पुस्तके यावेळी विक्रीसाठी उपलब्ध करून दिली.

रात्रीचा मुक्काम पुणे येथील रामकृष्ण मठात करून १५ तारखेस सकाळी यात्रा पुढील मुक्कामी, नाशिकला रवाना झाली. यात्रेच्या काही चित्रमय आठवणी.



स्वामी शिवानंद सरस्वती पादुका पुजन





सौ. राजलक्ष्मी देशपांडे प्रास्ताविक करताना



श्री. भ. रा. नाईक यांचे हस्ते सत्कार



स्वामी धर्मनिष्ठानंदजी यांचे उद्‌बोधन





स्वामी शिवचिदानंदजी मार्गदर्शन करताना



सौ. देसाई व सौ. जेरे विश्वात्मक प्रार्थना सादर करताना

**हिशेब**

पुणे मुक्कामी होणाऱ्या १४ जानेवारीच्या कार्यक्रमासाठी, शाखेने केलेल्या आवाहनानुसार खालील सदस्यांनी देणगी दिली आणि कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी हातभार लावला.

जमा -

₹ १००० श्री. मुकुंदराज कुळकर्णी

₹ ५००० श्री. भ. रा. नाईक

₹ १०,००० श्री. आनंद राव